आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१ मार्च २०२५ शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- नालंदा, तक्षशीला यासारख्या महत्त्वाच्या विद्यापीठांच्या पुनरुज्जीवनाची गरज उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्याकडून व्यक्त

- अंमलीपदार्थांच्या प्रकरणांमध्ये दोषी आढळणाऱ्या पोलिसांना बडतर्फ करण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा इशारा

- ज्येष्ठ लेखिका, प्रवासवर्णनकार डॉ. मीना प्रभू यांचं निधन

**आणि**

- रणजी करंडकाच्या अंतिम फेरीत चौथ्या दिवस अखेर विदर्भाचा संघ २८६ धावांनी आघाडीवर

**<><><><><>**

भारतात एकेकाळी ज्ञानाची केंद्रं म्हणून कार्यरत असलेल्या नालंदा, तक्षशीला अशा महत्त्वाच्या विद्यापीठांचं पुनरुज्जीवन व्हायला हवं, असं आग्रही प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज केलं. मुंबईत के. पी. बी. हिंदुजा वाणिज्य महाविद्यालयाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. शिक्षण आणि तंत्रज्ञान हे समाजपरिवर्तनासाठी महत्त्वाचे घटक आहेत, असं सांगून तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ग्रामीण जीवनाचा कायापालट घडवण्याचं आवाहन त्यांनी केलं. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, हिंदुजा समूह आणि महाविद्यालयाचे पदाधिकारी, अध्यापकवर्ग आणि इतर यावेळी उपस्थित होते. विविध विभागांमध्ये उत्तम कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव उपराष्ट्रपती आणि राज्यपालांच्या हस्ते या कार्यक्रमात करण्यात आला. तसंच एक पेड माँ के नाम या उपक्रमांतर्गत उपराष्ट्रपती धनखड आणि राज्यपाल राधाकृष्णन यांनी वृक्षारोपणही केलं.

<><><><><>

अंमलीपदार्थांच्या प्रकरणांमध्ये दोषी आढळणाऱ्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचं यापुढे केवळ निलंबन न करता पोलीस सेवेतून बडतर्फ केलं जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत झालेल्या पोलीस संमेलनात बोलत होते. या संमेलनात देशात नव्यानं तयार झालेल्या तिन्ही कायद्यांच्या अंमलबजावणीचं आणि सायबर प्लॅटफॉर्मचं सादरीकरण झालं. तसंच महिलांवरचे अत्याचार रोखण्यासाठी न्यायालयासमोर आरोपपत्र जलद गतीनं वेळेत कसं ठेवता येईल, यावर देखील चर्चा झाली. नवीन कायद्यानुसार एखाद्या गुन्ह्यात लोकांची जप्त केलेली संपत्ती परत करण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्याची अंमलबजावणी लवकरच केली जाईल. सहा महिन्यांत लोकांचा मुद्देमाल परत दिला गेला पाहिजे ज्यामुळे पोलिस ठाण्यांची जबाबदारी कमी होईल, असं मुख्यमंत्री म्हणाले.

<><><><><>

३५ व्या महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धेचा समारोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज ठाण्यात झाला. विविध क्रीडा प्रकारात सहभागी झालेल्या खेळाडूंचं फडणवीस यांनी अभिनंदन केलं. संघभावना जोपासण्यासाठी खेळ खेळणं आवश्यक आहे, त्यामुळे क्रीडा स्पर्धेत जास्तीत जास्त जणांनी सहभाग घ्यावा, असं आवाहन त्यांनी केलं. या स्पर्धेच्या माध्यमातून पोलिसांना आपलं कसब दाखवण्याची संधी मिळते असं फडणवीस म्हणाले. या स्पर्धेत १८ क्रीडा प्रकारात २ हजार ९२९ खेळाडूंनी सहभाग घेतला.

<><><><><>

राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रमाअंतर्गत राज्यस्तरीय मेळाव्याचं उद्घाटन पुण्यात आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झालं. राज्यभरात जिल्हास्तरावरच्या ३५, तर तालुकास्तरावरच्या ३५५ शाळांमधे हा कार्यक्रम राबवण्यात येत आहे. या

कार्यक्रमा अंतर्गत १८ वर्षे वयापर्यंतच्या सुमारे २० लाख मुला मुलींची मोफत आरोग्य तपासणी केली जाणार आहे. जन्मजात आजार आणि इतर आजारांवर मोफत उपचार तसंच संदर्भ सेवा आणि विनामूल्य शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. प्रत्येक बालकाचं आरोग्य आणि उज्ज्वल भविष्याची जबाबदारी शासन पूर्ण निष्ठेनं पार पाडत आहे, असं पवार यांनी सांगितलं.

.... **होल्ड - बाईट - अजित पवार**

**<><><><><>**

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज अहमदाबाद रेल्वे स्थानकाच्या पुनर्विकास कामाची पाहणी केली आणि मुंबई - अहमदाबाद बुलेट ट्रेन अर्थात जलदगती रेल्वेमागार्वरच्या आणंद स्थानकाच्या बांधकामाच्या प्रगतीचा आढावा घेतला. बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स आणि शिळफाटा या २१ किलोमीटरच्या बोगद्याचं काम सध्या वेगानं सुरु आहे. याशिवाय पालघर जिल्ह्यात डोंगरांमधून जाणाऱ्या सात बोगद्यांचं बांधकाम देखील गतीनं सुरू आहे. तिन्ही एलिव्हेटेड स्थानकांवर बांधकाम सुरू झालं आहे तसंच मुंबई बुलेट ट्रेन स्थानकाच्या स्लॅब टाकण्यात येत आहे.

**<><><><><>**

मजबूत विकासासाठी देशाला आधुनिक तंत्रज्ञानाची गरज असल्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत आयोजित इनोव्हर्स परिषदेत बोलत होते. भारत ही जगातली सर्वात वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था असून यात उद्योग क्षेत्राची भूमिका मोठी आहे, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

जागतिक कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रवास भारताशिवाय अपूर्ण असल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी म्हटलं आहे. ते आज 'मुंबई टेक वीक २०२५' मध्ये उपस्थितांशी संवाद साधताना बोलत होते. भारतासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता हे दीर्घकालीन धोरण असून आंतरराष्ट्रीय व्यापार करारांमध्ये ते महत्त्वाचा भाग

असल्याचं त्यांनी सांगितलं. भारत सध्या ७-८ प्रमुख विकसित देशांसोबत डेटा शेअरिंग नियमांबाबत सक्रिय चर्चा करत असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

<><><><><>

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी महिला आर्थिक विकास महामंडळानं आपल्या कार्याची व्याप्ती वाढवावी, अशी सूचना महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. महामंडळाच्या कामकाजासंदर्भात मंत्रालयात आज झालेल्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या.

<><><><><>

काँग्रेसचे विधानसभेतले मुख्य प्रतोद म्हणून आमदार अमित देशमुख यांची तर प्रतोदपदी शिरीषकुमार नाईक आणि संजय मेश्राम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उपनेते म्हणून अमीन पटेल तर सचिव म्हणून विश्वजित कदम यांची नियुक्ती झाली आहे. विधानपरिषदेचे गटनेतेपदी सतेज पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्य प्रतोदपदी अभिजीत वंजारी तर प्रतोदपदी राजेश राठोड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या आदेशानं ही नियुक्ती झाल्याचं काँग्रेसने पत्रकाद्वारे सांगितलं.

<><><><><>

सेबीच्या अध्यक्षपदाचा कार्यभार तुहिन कांत पांडे यांनी आज मुंबईत स्वीकारला. देशाच्या नागरिकांचा, संसदेचा, सरकारचा, गुंतवणूकदारांचा आणि या क्षेत्राचा सेबीवर विश्वास आहे, असं ते यावेळी माध्यमांशी बोलताना केलं. विश्वास, पारदर्शकता, परस्परसंबंध आणि तंत्रज्ञान या चार गोष्टी समोर ठेवून सेबी काम करते आणि म्हणूनच भारतीय बाजारपेठेवर संपूर्ण जगाचं लक्ष आहे, असं त्यांनी नमूद केलं.

<><><><><>

कृषिममंत्री माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला त्यांनी नाशिक जिल्हा सत्र न्यायालयात आव्हान दिलं असून यावर ५ मार्च रोजी न्यायालय निकाल सुनावणार आहे. सदनिका खरेदी करताना कोकाटे यांनी खोटी माहिती दिली यासाठी त्यांना दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा न्यायालयाने सुनावली आहे, या शिक्षेला स्थगिती मिळावी यासाठी कोकाटे यांनी अर्ज दाखल केला होता. कोकाटे यांच्या या मागणीला दोन अर्जदारांनी विरोध केला होता.

**<><><><><>**

मुंबईत अवैधपणे राहणाऱ्या ५ बांगलादेशींना मुंबई पोलिसांनी अटक केली. त्यात एका महिलेचा समावेश आहे. चिंचपोकळी इथं हे ५ जण राहत असल्याची खबर मिळाल्यावरुन काल रात्री ही कारवाई करण्यात आली.

**<><><><><>**

बीड जिल्ह्यात धारूर इथं एका शाळेत आज दहावीचा इंग्रजीचा पेपर सुरु असताना दोन मुलांनी अचानक पेपर घेऊन खिडकीतून पलायन केलं. मात्र पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी या दोघांना ताब्यात घेऊन पेपर जमा केला. आरोपीवर योग्य ती कारवाई केली जाईल, असं धारूर तालुका गट शिक्षणाधिकारी मनोज कोल्हे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

ज्येष्ठ लेखिका, प्रवासवर्णनकार डॉ. मीना प्रभू यांचं आज पुण्यात निधन झालं. त्या ८५ वर्षांच्या होत्या. गेल्या काही दिवसांपासून त्या आजारी होत्या आणि त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. डॉ. प्रभू यांनी सुमारे २० वर्षं लंडनमध्ये वैद्यकीय क्षेत्रात काम केलं. त्यांनी जगातल्या अनेक देशांमध्ये प्रवास केला आणि या प्रवासांदरम्यान आलेले अनुभव प्रवासवर्णनांद्वारे त्यांनी वाचकांसमोर मांडले. ‘माझं लंडन’ हे त्यांचं पहिलं प्रवासवर्णनात्मक पुस्तक होतं. त्यानंतर ‘इजिप्तायन’, ‘तुर्कनामा’, ‘दक्षिणरंग’, ‘गाथा इराणी’, ‘चिनी माती’ अशी त्यांची प्रवासवर्णनं

गाजली. दि. बा. मोकाशी पुरस्कार, गो. नी. दांडेकर स्मृती पुरस्कार, न. चिं. केळकर पुरस्कारांनी डॉ. मीना प्रभू यांना सन्मानित केलं होतं. गेल्या वर्षी साहित्यक्षेत्रातल्या योगदानासाठी महाराष्ट्र साहित्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कारही त्यांना मिळाला होता.

<><><><><>

नागपूरच्या विदर्भ क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर सुरु असलेल्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात आजच्या  चौथ्या दिवसअखेर विदर्भ संघाच्या दुसऱ्या डावात ४ बाद २४९ धावा झाल्या. विदर्भानं २८६ धावांची आघाडी घेतली आहे. खेळ थांबला तेव्हा करुण नायर नाबाद १३२ धावांवर खेळत होता.

<><><><><>

वेव्हज परिषदेत कम्युनिटी रेडिओ कंटेट स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. कम्युनिटी रेडिओ स्टेशनवरून प्रसारित होणाऱ्या नावीन्यपूर्ण, सर्जनशील कार्यक्रमांचं महत्व अधोरेखित करणं, प्रादेशिक वैशिष्ट्य आणि स्थानिक कलाकारांना सक्षम करणं हा याचा हेतू आहे. ही परिषद १ ते ४ मे रोजी मुंबईत आयोजित करण्यात आली आहे.

<><><><><>

मध्यमहाराष्ट्रात काही ठिकाणी तर कोकणात तुरळक ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत वाढ झाली आहे. येत्या दोन दिवसात कोकणात तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट  वातावरण राहण्याची शक्यता आहे. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यात पुढचे दोन दिवस उष्णतेची लाट येण्याची शक्यता असल्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. राज्यात उर्वरित ठिकाणी हवामान कोरडं राहील.

//<><><><><>//